20 JUN 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जैवविविधता विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल

कुलगुरू डॉ. शिर्के; शिवाजी विद्यापीठात मियावाकी जंगलनिर्मितीस प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जलसंवर्धनाच्या कामाबरोबरच आता शिवाजी विद्यापीठाने गर्द वनराईची निर्मिती हाती घेऊन जैवविविधता विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठ परिसरात शनिवारी मियावाकी जंगल (दाट वनराई) निर्मितीच्या अभिनव उपक्रमास कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ झाला. यावेळी ते बोलत होते. विद्यापीठ परिसरातील जैवविविधता विकासासाठीचे हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मत कुलगुरूंनी यावेळी व्यक्त केले. मियावाकी जंगल ही दाट वृक्षारोपणाची मूळ जपानी संकल्पना असून, त्यांतर्गत विविध प्रकारच्या प्रजातींची गर्द, दाट वनराई होईल, अशाप्रकारे लागवड करण्यात येते. यामुळे सदर परिसरात वनस्पतींच्या वैविध्यतेबरोबरच जैववैविधतेचाही मोठ्या प्रमाणात विकास होतो. विविध

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गर्द वनराईच्या लागवडीप्रसंगी वृक्षारोपण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

प्रकारचे पशू-पक्षी या वनराईच्या आश्रयास राहावयास येतात.

विद्यापीठाच्या क्रीडा संकुलाच्या शेजारील परिसरात मियावाकी जंगल लागवडीस कुलगुरूंच्या हस्ते जांभूळ रोप लावून प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बहावा व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते कांचन रोपे लावण्यात आली. साडेसात गुंठ्याच्या परिसरात बहावा, कांचन, जांभूळ, चिंच, विलायती चिंच, फणस, जास्वंद, अडुळसा, रातराणी, तगर, चाफा, धावडा आणि बांबू अशा तेरा प्रजातींच्या एकूण ९५८ रोपांची लागवड करण्यात आली. रोपे विद्यापीठाच्या रोपवाटिकेत तयार करण्यात आली आहेत. विद्यापीठ परिसरात दहा विविध ठिकाणी मियावाकी जंगलाची निर्मिती करण्याचा मानस आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

20 JUN 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मियावाकी वृक्ष लागवडीस प्रारंभ

कोल्हापूर, ता. १९ : "जलसंवर्धनाच्या कामाबरोबरच आता शिवाजी विद्यापीठाने गर्द वनराईची निर्मिती हाती घेऊन जैवविविधता विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे," असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ परिसरात मियावाकी जंगल (दाट वनराई) निर्मितीच्या अभिनव उपक्रमास कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठ परिसरातील जैवविविधता विकासासाठीचे हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मत डॉ. शिर्के यांनी व्यक्त केले.

मियावाकी जंगल ही दाट वृक्षारोपणाची मूळ जपानी संकल्पना असून, त्याअंतर्गत विविध प्रकारच्या प्रजातींची गर्द, दाट वनराई होईल, अशाप्रकारे लागवड करण्यात येते. यामुळे परिसरात वनस्पतींच्या वैविध्यतेबरोबरच जैववैविध्यतेचाही मोठ्या प्रमाणात विकास होतो.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

क्रीडा संकुलाच्या शेजारील परिसरात मियावाकी जंगल लागवडीस कुलगुरूंच्या हस्ते जांभूळ रोप लावून प्रारंभ केला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बहावा आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते कांचन रोपे लावली. त्यानंतर या साधारण साडेसात गुंठ्यांच्या परिसरात बहावा, कांचन, जांभूळ, चिंच, विलायती चिंच, फणस, जास्वंद, अडुळसा, रातराणी, तगर, चाफा, धावडा आणि बांबू अशा १३ प्रजातींच्या एकूण ९५८ रोपांची लागवड केली.

ही सर्व रोपे शिवाजी विद्यापीठाच्या रोपवाटिकेत तयार केली आहेत. विद्यापीठाच्या परिसरात दहा विविध ठिकाणी मियावाकी जंगलांची निर्मिती करण्याचा मानस आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2021
लोकमत

विद्यापीठात उद्या योग प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागामार्फत आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दरवर्षी योग वर्गाचे आयोजन केले जाते. यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग केंद्रामार्फत उद्या, सोमवारी सकाळी ७ ते ८ या दरम्यान ऑनलाइन योग वर्ग प्रशिक्षण आयोजित केले आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2021
पुढारी

शिवाजी विद्यापीठातर्फे उद्या ऑनलाईन योग वर्गाचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

दरवर्षी २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. यादिवशी शिवाजी विद्यापीठातील विविध विभागांमार्फत योग वर्गाचे आयोजन करण्यात येते. परंतु, कोव्हिड-१९ च्या परिस्थितीमुळे यावर्षी विभागातंर्गत शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या योग केंद्रामार्फत सोमवारी (दि.२१) सकाळी ७ ते ८ यावेळेत ऑनलाईन योग वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या वतीने यू-ट्यूबवर शिववार्ता नावाने लिंक देण्यात आली आहे. विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी यांनी ऑनलाईन योग प्रशिक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

20 JUN 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोरोना संकटकाळात चांगले संदेश पोहोचविण्यासाठी लघुपट उत्तम माध्यम

अनंत खासबारदार; विद्यापीठात 'स्पार्क' चित्रपट महोत्सव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोरोना संकटात सध्या अनेक जण रुग्णांना अन्न पुरवणे, आर्थिक व मानसिक आधार देणे, अशी समाजोपयोगी कामे करत आहेत. याचे भान राखून हा संदेश अधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. लघुपट हे त्यासाठी उत्तम माध्यम आहे, असे मत 'निर्मिती' जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने शनिवारी (१९ जून) 'स्पार्क' चित्रपट महोत्सवाचे ऑनलाईन पद्धतीने झाले. यावेळी ते बोलत होते. 'कोव्हिड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती' या विषयावर त्यांनी बीजभाषण केले. कोरोना काळात केवळ

शिवाजी विद्यापीठातून...

मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करणे, एकमेकांत अंतर ठेवणे या प्राथमिक गरजांपलीकडे आता परिस्थिती गेली आहे. याचा विचार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी 'कोरोना काळात घ्यायची काळजी' या विषयावर विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले.

चित्रपट महोत्सवात विभागाचे माजी विद्यार्थी मल्हार जोशी व आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित 'पूर्णविराम' व निर्माते शैलेश कोरे यांच्या 'वाकळ' या लघुपटाचे प्रदर्शन झाले. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माते शैलेश कोरे यांच्यासह विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांनी साहाय्य केले. माहितीपट निर्माते सरफराझ मुल्ला यांनी आभार मानले. मुंबई विद्यापीठाचे डॉ. प्रसाद ठाकूर, बारामती महाविद्यालयाचे प्रा. जयप्रकाश पाटील, जयेंद्र राणे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशनच्या अश्विनी कांबळे, विभागातील सहयोगी प्रा. चंद्रशेखर वानखेडे, व्याख्यात्या अनुराधा इनामदार आदी ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JUN 2021

पुण्यनगरी

कोरोनाबाबत जनजागृतीसाठी लघुपट उत्तम माध्यम

अनंत खासबारदार : शिवाजी विद्यापीठात 'स्पार्क' चित्रपट महोत्सव

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोरोना काळात केवळ मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करणे, एकमेकांत अंतर ठेवणे या प्राथमिक गरजांपलीकडे आता परिस्थिती गेली आहे. लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे आणि लघुपट हे त्यासाठी उत्तम माध्यम आहे, असे प्रतिपादन 'निर्मिती' जाहिरात संस्थेचे अनंत खासबारदार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने शनिवारी 'स्पार्क' चित्रपट महोत्सव गुगल मीटद्वारे ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. महोत्सवाचे यंदा पाचवे वर्ष असून, 'कोरोना काळात घ्यायची काळजी' या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. अनंत खासबारदार यांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यांनी 'कोविड-१९ आणि आरोग्यविषयक जाहिराती' विषयावर बीजभाषण केले. महोत्सवात विभागाचे माजी

विद्यार्थी मल्हार जोशी, आकाश बोकमूरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'पूर्णविराम'चे प्रदर्शन करण्यात आले. लघुपट निर्माते शैलेश कोरे यांच्या 'वाकळ' या लघुपटाचेही प्रदर्शन झाले. विभागाचे विद्यार्थी मनाली पाटील (पॉझिटिव्ह ॲप्रोच), अनुराधा धामणे (लेट्स मास्क अप), निहारिका देशपांडे (सुनो पँडेमिक), प्रणाली पवार (स्टे होम, स्टे सेफ), अतुल होवाळे (यूज मास्क, डिस्पोझ प्रॉपर्ली), विनायक लोहार (जर्म्स आर नॉट फॉर शेअरिंग), रुणाल भोई (डोन्ट लेट जर्म्स गेट यू डाऊन) आणि सोमदत्त देसाई (वुई दी ह्युमन) या जाहिरातपर लघुपटांचे प्रदर्शन झाले. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले.

चित्रपट निर्मात्या अमृता महाडिक, लघुपट निर्माते शैलेश कोरे यांच्यासह विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे यांनी यासाठी विशेष सहाय्य केले. माहितीपट निर्माते सर्फराझ मुल्ला यांनी आभार मानले. डॉ. प्रसाद ठाकूर, प्रा. जयप्रकाश पाटील, जयेंद्र राणे, माजी प्रा. अश्विनी कांबळे, प्रा. चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार यांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शवली.